दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ५६ रविवार दि.३१ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## एका मिनिटांत होतंय जीआरसाठी आता वेळ देणार नाही, जरांगेंच्या युक्तिवादाने शिंदे समितीही निरुत्तर



मराठा आरक्षणाच्या मागणीवर राज्यभरातील मराठा समाज आक्रमक झाला आहे. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळावे यासाठी गेल्या दोन दिवसापासून मराठा आंदोलक मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करीत आहेत. त्यामुळे राज्यभरातील वातावरण चांगलेच तापले आहे. राज्य सरकारच्या मराठा आरक्षण उपसमितीने कुणबी नोंदी शोधण्यासाठी निवृत्ती न्यायमूर्ती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे समितीची स्थापना शनिवारी केली आहे. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीने उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटलांची भेट घेतली. यावेळी जरांगे पाटील यांनी मोठे विधान केले.

जरांगे यांच्या भेटीसाठी आलेल्या शिंदे समितीने मागण्यांची अंमलबजावणीसाठी काही वेळ मागितला. मात्र जरांगे पाटलांनी हैदराबाद आणि सातारा संस्थानचे गॅझेटिअर लागू करण्यासाठी एक मिनिटही वेळ देणार नाही, असे विधान केलं आहे.

यावेळी मनोज जरांगे (चरपेक्ष गरीरपसश) म्हणाले की, 'येत्या शनिवार–रविवारच्या आत काही झाले नाही तर एकही मराठ्याचे लेकरूबाळ घरी राहणार नाही. महाराष्ट्रातील मराठा घरात दिसणार नाही. अजून सहा सात दिवस हातात आहे. आणखी वेळ गेली नाही. तुमचा अहवाल घ्यावा त्यांनी आणि अंमलबजावणी करावी. मराठवाड्यातील मराठा कुणबी आहे, असे जाहीर करा आणि उद्यापासूनच प्रमाणपत्र द्या, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावर शिंदे समितीने खूप अभ्यास केला आहे. या दोन गॅझेटनुसार मराठवाड्यातील मराठा हा कुणबीच आहे. यात वादच नाही. सातारा संस्थानचं गॅझेटिअर लागू करा. औंध संस्थांन आणि बॉम्बे गव्हर्नेमेंटच्या गॅझेटला पंधरा वीस दिवस देऊ. पण हैद्राबाद आणि सातारा संस्थानचं गॅझेट लागू करायला एक मिनिटही वेळ देणार नाही. १३ महिने दिले. , असेही यावेळी जरांगे पाटील म्हणाले.

एखादं गाव आहे, तिथं त्या काळी १०० लोकं दाखवले, नावं नाहीत, आडनावं नाही, पण आताचा मराठा जो आहे तो कुणबी आहे. गॅझेटमध्ये नावं नसली तरी त्याच गावातले १०० लोक होते हे तरी नक्की आहे. गॅझेटच मराठ्यांसाठी आहे. त्या गॅझेटमध्ये असलेला मराठा कुणबी आहे. जर तो कुणबी नसेल तर मग दुसरं कोण कुणबी आहे? , असेही जरांगे म्हणाले.

एखादा न्यायाधीश असेल आणि त्यांचा मुलगा न्यायाधीश झाला नाही तर त्याच्या वडिलांना न्यायाधीश म्हणायचं नाही का? मग जर एखाद्या कुणब्याच्या मुलाने शेती केली नाही तर तो कुणबी राहणार नाही का? तुम्हाला अटी घातल्यात तुम्ही बोलत नाहीयेत.

## साबला ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थ यांच्या वतीने ओम नाईकनवरे यांचा सत्कार सोहळा संपन्न



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साबला येथील ओम अभिमान नाईकनवरे यांची जिल्हा परिषद बीड आरोग्य सेवक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा ग्रामपंचायत कार्यालय , साबला तसेच साबला नगरीतील सर्व ग्रामस्थांच्या वतीने ओम अभिमान नाईकनवरे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जनाबाई नरहरी काकडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे,माजी सरपंच मधुकरराव काकडे , माननीय लहूराव राऊत – महिला व बालविकास संरक्षण अधिकारी , श्रीमती चंद्रभागा अभिमान नाईकनवरे – अंगणवाडी सुपरवायझर यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

सत्कार समारंभ प्रसंगी ओम नाईकनवरे यांनी आपल्या मनोगतातून प्रथम सर्व उपस्थितांचे आभार मानले . आणि या माझ्या यशात प्रथम माझे आईवडील , तसेच माझी मोठी बहिण चंद्रभागा राऊत व मेहुणे लहूराव राऊत तसेच माझे सर्व कुटुंबीय सुध्दा आहेत . सत्कार प्रसंगी भावुक होऊन ओम नाईकनवरे यांनी असे म्हटले की,पुढील सेवेच्या कार्यकालात सर्वांची सेवा ही माझ्या कुटुंबातील सदस्य आहेत.अस समजून त्यांची सेवा करण्याची अशी ग्वाही त्यांनी दिली.

याकार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच सौ.जनाबाई काकडे यांनी असे म्हटले की,ओम नाईकनवरे यांची परिस्थिती ही सर्वसाधारण कुटुंबातील असून आई आणि वडिल हे शेतात काबाड कष्ट करतात . शेतीही जास्त नाही . शेतीतील उत्पन्न ही पावसावर अवलंबून आहे . मग आपण अभ्यास नाही केला तर आपले काय होईल . याचा विचार करून ओम नाईकनवरे यांनी चांगले यश मिळविले याबद्दल सरपंच सौ.जनाबाई काकडे यांनी ओम नाईकनवरे यांचे अभिनंदन करून पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या. माजी सरपंच मधुकरराव काकडे, उमाशंकरराव शिंदे–माजी पोलिस उपनिरीक्षक,आदर्श शिक्षक विक्रमराव नाकईनवरे, लहूराव राऊत,चंद्रभागा राऊत यांनीही ओम नाईकनवरे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी साबला नगरीतील सर्व लहान थोर वडिल धारी मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक सुधीर नाईकनवरे यांनी केले . तर आभार प्रदर्शन माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे यांनी मानले .

## कनिष्ठ अभियंता यांच्या वर कठोरपणे कार्यवाही करण्यात यावी अन्यथा महावितरण कार्यालया समोर आमरण उपोषण करणार – मुबशीरोदीन खतीब

केज/प्रतिनिधी केज येथील पत्रकार एम.एम. खतीब यांनी महावितरणच्या शाखा अभियंता यांच्या हीटलरशाही आणि गलथान कारभाराला केज सह तालुक्यातील नागरीक त्रस्त झाले आशा मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती याच बातमीचा मनात राग धरून २९ ऑगस्ट२०२५ रोजी कळंब– रोड येथील पत्रकार खतीब यांच्या कार्यालयासमोर येऊन कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद ह्या आल्या व मला म्हणाल्या की,तु माझी बातमीच्या माध्यमातून बदनामी केली आहे तुला फार मोठी किंमत चुकवावी लागेली मी आता तुला सोडणार नाही. माझ्या पदाचा व अधिकाराचा वापर करून तुझ्या कडून दोन लाख रुपये वसूल करून तुझ्यावर कसल्याही प्रकारच्या खोट्या गुन्ह्यात तुला आडकविणार आशी मला धमकी दिली, या आगोदर मी मोठ्या मोठ्या मंत्र्यांवर गुन्हे दाखल केलेले आहे तर तु एक मामुली पत्रकार काय चीज आहे. तु लावलेल्या बातमीमुळे माझी बदनामी झाली मी पण तुझी आशीच बदनामी करणार तुझ्या सारखे लय पत्रकार बघीतले तुमच्या सारख्या चिल्लर पत्रकाराघी औकात नाही मला खेटण्याची आशी मला अपमानास्पद भाषा वापरून मला व माझ्या पत्रकारितेला अपमानीत केले.कनिषठ अभियंता श्रीमती शितल सय्यद ह्या केज येथे आल्यापासून सतत केज शहरात व ग्रामीण भागातील ग्राहकांना अपमानास्पद वागणूक देत आहेत .आशायाची माहीती मी आपलेला वेळोवेळी मोबाईल द्वारे माहिती दिली व दैनिकांत प्रसारीत झालेल्या बातम्या आपणास पाठवल्या होत्या त्या अनुषंगाने आपणही सदर प्रकरणी त्यांना जाब विचारला म्हणून त्यांनी माझ्या समवेत बोलून दाखवले आहे.सदर प्रकरणी तात्काळ चौकशी करून दोन दिवसांत दोषी कनिष्ठ अभियंता यांच्यावर कठोर कारवाई करावी अन्यथा २ सप्टेंबर२०२५रोजी केज येथील महावितरण कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषण करणार आहे तरी यांची आपल्या स्तरावर नोंद घ्यावी. पत्रकार यांच्या विषयी अपशब्द वापरल्या प्रकरणी व पत्रकारीतेच्या अवमान करून मला धमकी दिली बदल व गोल टोपी



वाला पत्रकार म्हणून स्वतःच्या मोबाईल मध्ये व्हाट्सअप वर स्टेटस ठेऊन माझा व समस्त मुस्लिम समाजातील लोकांचा व पत्रकार बांधवांचा आणि माझ्या पत्रकारितेचा आवमान कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद यांनी केला आहे तरी वरील होणारया परीणामास कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद आपण जबाबदार रहाताल अशा आशयाचे निवेदन उर्जा मंत्री महाराष्ट्र राज्य, मुख्य अभियंता साहेब, महावितरण लातुर, कार्यकारी अभियंता अंबाजोगाई , तहसीलदार साहेब केज, पोलिस स्टेशन केज,उपअभियंता साहेब महावितरण केज या निवेदन देण्यात आले आहे. जर सदर प्रकरणी तात्काळ कारवाई करण्यात आली नाही तर २ सप्टेंबर रोजी केज महावितरण कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री नितीश कुमारांचे महिलांसाठी मोठं गिफ्ट; सप्टेंबरपासून मिळणार १० हजार रुपये; काय आहे नवी योजना?

बिहारमध्ये आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने विविध योजनांची घोषणा केली जात आहे. याचदरम्यान आता बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी महिलांसाठी एक मोठी योजना सुरू केली आहे. महिलांना रोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक सहकार्य प्रदान करण्याच्या हेतूने एक योजना सुरु करण्याची घोषणा केली आहे. 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजना' ही नवीन योजना सुरू करण्यात आल्याची माहिती नितीश कुमार यांनी दिली आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर पोस्ट करत मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सांगितले की, 'मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेला मंजुरी मिळाली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील प्रत्येक कुटुंबातील एका महिलेला तिच्या आवडीचा रोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाईल. याअंतर्गत सप्टेंबरपासून १० हजार रुपये दिले जाणार आहेत. सरकारचा विश्वास आहे की या पावलामुळे महिला केवळ स्वावलंबी होणार नाहीत, तर कुटुंबाच्या उत्पन्नात आणि राज्याच्या प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देतील.' पुढे नितीश कुमार यांनी लिहिले, नोव्हेंबर २००५ पासून आमच्या सरकारने महिला सशक्तीकरणासाठी अनेक कामे केली आहेत. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत. आज महिला कुटुंब आणि राज्याच्या प्रगतीत योगदान देत आहेत. आता आम्ही या दिशेने आणखी एक मोठे पाऊल उचलत आहोत. या योजनेमुळे केवळ महिलांची आर्थिक स्थिती मजबूत होईल असे नाही, तर रोजगाराच्या संधीही वाढतील. यामुळे बिहारमधील महिला राज्यातच रोजगार मिळवतील आणि रोजगारासाठी बाहेर जाण्याची सक्ती कमी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. योजनेत काय आहे खास? प्रत्येक कुटुंबातील एका महिलेला रोजगार सुरू करण्यासाठी १० हजार रुपयांचा पहिला हप्ता मिळेल. सप्टेंबर २०२५ पासून ही रक्कम महिलांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरित केली जाईल. रोजगार सुरू केल्यानंतर सहा महिन्यांनी कामाचा आढावा घेतला जाईल.

## बिहारची जनताच पुन्हा एकदा भाजपचा रथ थांबवेल; मतदार हक्क यात्रेत अखिलेश यांचा दावा

पाटणा : आम्ही भारतीय जनता पार्टीला अवधमध्ये (अयोध्या) पराभूत केले, मगधमध्ये तुम्ही त्यांना पराभूत करा असे आवाहन समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी आज मतदार हक्क यात्रेदरम्यान केले. बिहारची ही एक महत्त्वाची निवडणूक आहे व त्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष आहे. येथे असलेला हा उत्साह सांगत आहे की जनता आता भारतीय जनता पार्टी आणि त्यांच्या मित्रपक्षांना पराभूत करणार आहे असेही अखिलेश यादव म्हणाले.



अखिलेश शनिवारी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राजद नेते तेजस्वी यादव यांच्यासह मतदार हक्क यात्रेत सामील झाले. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. १७ ऑगस्ट रोजी सासाराम येथून सुरू झालेली १६ दिवसांची ही मतदार हक्क यात्रा १ सप्टेंबर रोजी पाटण्यामध्ये विशाल पदयात्रेने संपन्न होणार आहे. भाजपने निवडणूक आयोगाला जुगाड आयोग बनवले आहे. विशेष सघन आढाव्यापेक्षा (एसआयआर) वेडा निर्णय कोणता असूच शकत नाही. बिहारने एकदा भाजपचा रथ थांबवला होता आणि यावेळीही बिहारचे लोक भाजपचा रथ थांबवतील असा दावा त्यांनी केला.

अखिलेश यादव पुढे म्हणाले, भारतीय जनता पार्टी लोकांचा वापर करते. ती लोकांचा वापर करेल आणि नंतर त्यांचा नाश करेल. निवडणूक आयोग भाजपच्या सहकार्याने काम करत आहे, बिहारच्या लोकांनी हे देखील पाहिले आहे

## भारत माता की जय. अमर रहे अमर रहे घोषणा देत मराठा सेवक सतीश देशमुख यांच्यावर अंत्यसंस्कार

> माझे चुलते सतीश देशमुख यांचा एक मुलगा पूर्वी विजेचा शॉक लागून मृत्यू पावला आहे. तर त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आणि वाईट असल्याने त्यांच्या लहान मुलाला न्याय देऊन त्याला सरकारी नोकरी द्या.
> -- जयदीप देशमुख (पुतणे)

केज मराठा समाजाच्या आरक्षण मागणीसाठी अंतरावली सराटी ते मुंबई निघालेल्या मोर्चात सहभागी झालेले बीड जिल्ह्यातील वरपगाव ता. केज येथील मराठा सेवक स्व. सतिश ज्ञानोबा देशमुख यांचा हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने पुणे जिल्ह्यात मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असून त्यांच्यावर कर्ज आहे आणि ते अल्पभूधारक शेतकरी असल्याने त्यांच्या मुलाचा समावेश सरकारी नोकरीत करण्यात यावा; तो पर्यंत स्व. सतिश देशमुख यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करणार नसल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली होती. शासनाचा आदेश आल्या नंतर त्या बाबत प्रस्ताव पाठवून देण्या संदर्भात तहसीलदारांनी आश्वासन दिल्या नंतर आज त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. बीड जिल्ह्यातील वरपगाव ता. केज येथील सतीश ज्ञानोबा देशमुख या ४५ वर्षीय तरुणाचा मनोज दादा जरांगे यांच्या आंतरवली सराटी ते मुंबई या मराठा आरक्षण मागणीसाठी निघालेल्या मोर्चात सहभागी असताना दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९:०० त्यांना जुन्नर येथे हृदय विकाराचा झटका आला. त्या नंतर त्यांना पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथील रुग्णालयात मृत्य झाला होता. मृत्यू झाल्याचे समजताच मनोज दादा जरांगे यांनी नारायणगाव येथील रूग्णालयात जाऊन त्यांच्या भावाचे सांत्वन केले. दरम्यान सतीश देशमुख यांचे पार्थिव वरपगाव येथे आणण्यात येत असून दि. २९ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी ९:०० वाजता अंत्यविधी होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र दि. २८ ऑगस्ट रोजी रात्री ९:०० वाजण्याच्या सुमारास वरपगाव येथील नागरिकांनी तहसीलदारांना निवेदन दिले असून त्यात म्हटले




आहे की, सतीश देशमुख यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आहे. ते अल्पभूधारक शेतकरी असून त्यांच्यावर सेवा सहकारी सोसायटीचे कर्ज आहे. त्यामुळे सतीश देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय देण्यात यावा. त्यांच्या मुलाला सरकारी नोकरी देण्यात यावी. जो पर्यंत या कुटुंबाला न्याय मिळत नाही आणि त्यांच्या मुलाला सरकारी नोकरीत समावेश होत नाही. तो पर्यंत स्वर्गीय सतिश देशमुख यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार न करण्याचा निर्णय वरपगाव येथील ग्रामस्थानी घेतला होता. या संदर्भात गावकऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देखील दिले होते. आज दि. २९ ऑगस्ट रोजी पहाटे त्यांचे प्रेत नारायणगाव येथून आणण्यात आल्या नंतर ते केज उपजिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आले होते. दरम्यान तहसीलदार राकेश गिड्डे यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन शासनाकडून मुलाच्या नोकरी संदर्भात आदेश प्राप्त झाल्या नंतर त्याचा अहवाल पाठवीला जाईल आणि त्याचा पाठपूरचा केला जाईल असे आश्वासन केन तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिल्या नंतर दुःखद वातावरणात सतीश देशमुख यांच्यावर वरपगाव येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आला. यावेळी वरपगाव मठसंस्थानचे मठाधिपती भगवान महाराज शास्त्री, माजी आमदार सुनील धांडे, तहसीलदार राकेश गिड्डे, डॉ टी एल देशमुख, पांडुरंग आवारे पाटील, पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांच्यासह अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. केज तालुक्यातून सकल बहुजन मराठा समाज बांधवही खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## उत्तरेतील पूरसंकट

निसर्गचक्र बदलले असल्याचा अनुभव गेली काही वर्षे सातत्याने येत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी आणि अवकाळी पाऊस या तिहेरी संकटात जगाप्रमाणे भारतही सापडला आहे. उत्तर भारतात मुसळधार पावसाने आणि त्यानंतर आलेल्या पुरामुळे सध्या भीषण स्थिती निर्माण झाली आहे. पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मू काश्मीरमध्ये पूर व भूस्खलनामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली, शेकडो गावांचा संपर्क तुटला.

सरकारी यंत्रणा युद्धपातळीवर बचावकार्य करत असून, मृतांची संख्या वाढत आहे. हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील भरमौर येथे शुक्रवारी मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात मणिमहेश यात्रेसाठी निघालेल्या ११ भाविकांचा मृत्यू झाला. यात्रेकरू मणिमहेशच्या दिशेने जात असताना अचानक दरड कोसळली आणि अनेक जण त्याखाली दबले. दुसरीकडे प्रचंड पावसामुळे मंगळवारी जम्मूतील माता वैष्णोदेवी मार्गावर भूस्खलन झाल्याने ४१ भाविकांचा मृत्यू झाला.

या नैसर्गिक आपत्तीमुळे वैष्णोदेवी यात्रा स्थगित करावी लागली. पंजाबमधील ७ जिल्हे आणि दीडशेहून अधिक गावांना पुराचा तडाखा बसला असून, तेथील शाळा बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. हिमाचल प्रदेशात सततच्या पाऊस आणि भूस्खलनामुळे सर्वाधिक नुकसान झाले. चंदीगड–मनाली महामार्गावर दरडी कोसळल्या असून श्रीनगरमध्ये तर मुसळधार पावसामुळे पाणी नागरी वस्तीत शिरले. उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेशात संततधार पावसाने कहर केला. ढगफुटीपासून पुरापर्यंत अनेक संकटांचा संपूर्ण हंगामात अनुभव आला. मान्सूनचा पट्टा हिमालयाच्या पायथ्याशी सरकला असून हवामानातील तीव्र बदलांमुळे उत्तर भारतात तुफान पाऊस पडत आहे. जेव्हा दोन विविध प्रकारच्या हवामान प्रणालींची परस्परांशी टक्कर होते, तेव्हा थंड हवा आणि वाढीव आर्द्रता दिसून येते. या विचलनामुळे ढग तयार होऊन, उत्तर भारतात मुसळधार पाऊस पडत आहे. अशावेळी भूस्खलन आणि पावसाशी संबंधित अन्य धोक्यांचाही उद्भव होत असतो. केदारनाथमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे २०१३ मध्ये जणू काही प्रलयच आला होता. त्या दुर्घटनेत ५ हजारांपेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडले होते.

आता उत्तराखंडमधील कोटद्वार येथे आलेल्या पुरामुळे राष्ट्रीय महामार्ग वाहून गेला. बद्रीनाथ महामार्गावर भूस्खलन झाल्याने हजारो यात्रेकरू अडकले होते, तर उधमसिंह नगरमध्ये घराघरांत पाणी शिरले. गंगोत्री धाम मार्गावरील लोकप्रिय पर्यटनस्थळ धराली तीन आठवड्यांपूर्वी अवघ्या ३४ सेकंदांत उद्ध्वस्त झाले. खीरगंगा नदीतून अचानक ढिगार्यासह येणार्या पाण्याच्या लाटेमुळे संपूर्ण गाव वाहून गेले. उत्तराखंडमध्ये गेल्या काही वर्षांत वारंवार संकटे येत असून, दोन वर्षांपूर्वी जोशीमठ या धार्मिक स्थळाची प्रचंड हानी झाली होती. खीरगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या ढगफुटीमुळे अचानक पूर येऊन अनेक घरेही वाहून गेली, तर डोंगराळ भागात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे पंजाबातील पठाणकोट, जालंदर, गुरुदासपूर, होशियारपूर, अमृतसर, कपूरथळा, फिरोजपूर आणि फाजिलकी जिल्ह्यातील अनेक गावे सध्या पुराच्या विळख्यात सापडली आहेत.

जम्मू–पठाणकोट महामार्गावरील वाहतूक बंद असून, ट्रकच्या लांबच लांब रांगा कित्येक किलोमीटरपर्यंत तेथे लागल्या आहेत. १९८८ नंतर पहिल्यांदाच रावी नदीने जनजीवन विस्कटून टाकले. पंजाबमधील पुरामुळे होणारी शेतीची अपरिमित हानी अधिक गंभीर आहे. कारण, त्यामुळे गव्हासारख्या प्रमुख पिकांनाही झळ पोहोचते. पंजाब हे देशाचे धान्याचे कोठार समजले जाते. तेथील महामार्ग ठप्प होणे म्हणजे धान्यपुरवठ्याची साखळी विस्कळीत होणे. जम्मूत भूस्खलनामुळे मोठे नुकसान झाले. तेथील अनेक छोटे पूल व मोबाईल टॉवर कोसळले. अतिवृष्टीमुळे जम्मूच्या विविध भागांतील परिस्थिती गंभीर असून, जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी प्रशासनाला सतर्कता बाळगण्याचे आदेश दिले. या राज्यातही सतत दरडी कोसळत असतात.

मुळात हिमालयाच्या रांगांमधील प्रदेश हा भूकंपप्रवण असून, हिमालय पर्वत हा भुसभुशीत आहे. तेव्हा रस्ते अथवा बोगदे या स्वरूपाची कामे हाती घेताना निसर्गाच्या समतोलास धक्का लावला जातो, त्याचे भयंकर परिणाम दिसून येत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. रस्ते, पर्यटन आणि विकासकामांसाठी हिमालयात डोंगर आडवे–उभे कापले जात आहेत. पर्वतरांगा आतून–बाहेरून पोखरल्या जात आहेत. उत्तराखंडमधील अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी तेथे पर्यटन विकास करण्याचीही गरज आहे; पण हा विकास साधताना पर्यावरणाचा तोल ढळणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. त्यासाठी झाडे वाट्टेल तशी तोडणे, जंगले ओसाड करणे आणि एकूणच निसर्गाशी खेळ धोकादायकच. जम्मू–काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडात असे काही बर्फाच्छादित भाग आहेत, जे कधीही तुटू शकतात. सिंधू नदीच्या उत्तरेस नंगा पर्वतापासून अफगाणिस्तानपर्यंत काराकोरम पर्वताची रांग पसरली असून ती धोकादायक समजली जाते.

काराकोरममधील श्योक नदीचा प्रवाह एका हिमखंडाने रोखला आहे. यामुळे तेथे छोटे छोटे तलाव बनले आहेत. २१व्या शतकाचा आरंभ होताना निसर्गाची राजरोस आणि सातत्याने हत्या होत असून, या कटू वास्तवाची जाणीव सर्वांना होऊ लागली. जीवसृष्टीच नष्ट झाली, तर मानवजात जगू शकणार नाही, या भयप्रद भविष्याकडे गतीने वाटचाल सुरू आहे, असे मत जगद्विख्यात पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांनी व्यक्त केले होते. सध्या निसर्ग हाच अडथळा मानून त्याला नष्ट करण्याचा चंग माणसाने बांधला आहे. निसर्गापासून झालेली मानवाची फारकत हेच सर्व समस्यांचे मूळ आहे. आदिवासी व शेतकरी यांच्याकडे जे उपजत पर्यावरणीय शहाणपण असते, तथाकथित विकासवाद्यांमध्ये मात्र त्याचा अभाव असल्याचे जाणवू लागले आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गावर हल्ले करण्याचे आपण थांबवत नाही, तोपर्यंत हिमस्खलन, भूस्खलन, महापूर यासारखी संकटे वारंवार येतच राहतील. निसर्ग आपणास भरभरून देत असतो. त्यामुळे माणसाने किमान निसर्गातील हस्तक्षेप टाळून मानवजातीचे आणि पुढच्या पिढ्यांचे भवितव्य धोक्यात येणार नाही, याची तरी काळजी घ्यायला हवी.

# बाबासाहेबांनी आम्हाला माणसात आणलं.

सोमनाथ पाटील यांचा लेख वाचला आणि त्यावर व्यक्त व्हावसं वाटलं,लेख वाचताना मन सुन्न होतं.कारण हा लेख केवळ आठवणींचा नाही,तर एका आत्मस्वीकाराचा प्रवास आहे.साधारणपणे जेव्हा आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांविषयी बोलतो, तेव्हा लक्ष जातं की त्यांनी दलित,बहुजन,वंचित समाजाला माणुसकी दिली,त्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली.पण पाटील यांचा ठाम दावा आहे की बाबासाहेबांनी दलितांना नव्हे,तर सवर्णांना माणसात आणलं.दलित मुळात माणूस होतेच,पण सवर्ण वागणुकीतून माणसात नव्हते.ही गोष्ट स्पष्ट,कठोर आणि अस्वस्थ करणारी आहे.पण याच ठिकाणी सत्य दडलं आहे.

गावगाड्याचा खोटा रोमँटिसिझम.

गाव म्हणजे गोडवा,निरागसता,आपुलकी–अशी प्रतिमा आपल्यासमोर मांडली जाते. कवी आणि लेखक गावाचं कौतुक करतात.पण पाटील गावगाड्याच्या या गोंडस प्रतिमेला धक्का देतात. त्यांना कळतं की गावगाडा हा शोषणाच्या संस्कृतीवर उभारलेला होता. वाडे, माड्या,देवळं–ही केवळ वास्तू नव्हती,ती दलितांच्या श्रमांचं रक्त शोषून उभी राहिलेली स्मारकं होती.महारवाड्यातले पुरुष,स्त्रिया,मुलं जनावरांसारखे राबले.त्यांच्या पायांवर फोड आले,खांदे वाकडे झाले,केस गेले,पण बदल्यात मिळाली ती फक्त शेरभर ज्वारी,कळणा कोंडा किंवा ताकाचं तपीलं.आज गावाची आठवण काढताना बहुतांश सवर्ण समाजाला अभिमान वाटतो,पण पाटील यांना अपराधीपणाची जाणीव होते.कारण त्यांना समजलं की त्यांच्या पिढ्या ज्या वैभवात राहिल्या,त्यामागे दलितांच्या घामाचं,रक्ताचं,अपमानाचा इतिहास दडलेला आहे.

अपराधाची कबुली

सोमनाथ पाटील यांच्या लेखातील सर्वात प्रभावी भाग म्हणजे त्यांचा आत्मस्वीकार.–शाळेत दलित मुलांना वेगळी रांग लावली जायची.बाबासाहेबांच्या चित्राला मिशा काढून विद्रुप करायचो. जातिव्यवस्थेचा दोष फक्त ब्राह्मणांवर ढकलून आम्ही निर्धास्त राहत होतो.ही सगळी कबुली एका अपराधी भावनेतून आलेली आहे. कारण खऱ्या अर्थाने दलितांच्या दुःखाला जबाबदार फक्त ब्राह्मण नव्हते,तर सवर्ण समाजातील प्रत्येक पाटील,वाडकरी,शेतकरी होता.व्यवस्थेची चौकट ब्राह्मणांनी आखली असली तरी तिचा भोग आणि उपभोग इतरांनी केला.ही सत्यकबुली फार कमी लोक देतात.

बाबासाहेबांचं खरं योगदान.

बहुतेक वेळा आपण म्हणतो की बाबासाहेबांनी दलितांना माणसात आणलं. पण पाटील यांची ठाम धारणा आहे की दलित आधीपासून माणूसच होते. शोषण करणारा वर्ग मात्र माणुसकी हरवून बसला होता.बाबासाहेबांनी दलितांना स्वतंत्र उभं केलं, त्यांना शिक्षण,हक्क,कायदे दिले. पण त्याचवेळी शोषकांना देखील आरसा दाखवला. त्यांना समज दिली की माणसासारखं वागणं म्हणजे काय?.दलितांना नव्हे तर सवर्णांना माणुसकी शिकवणं–हे बाबासाहेबांचं मोठं कार्य आहे.कारण जर दलितांना वेगळं करून स्वतंत्र मार्ग दिला नसता,तर सवर्ण समाज अजूनही त्यांचं रक्त शोषत राहिला असता.म्हणूनच पाटील भावनिकपणे लिहितात की बाबासाहेबांचं ऋण आमच्या कातडीचा जोडा शिवूनही फिटणार नाही.



माणसात येण्याचा प्रवास.

सोमनाथ पाटील स्वतः मान्य करतात की माणसात येणं ही सोपी प्रक्रिया नाही. हजारो वर्षांची जातिव्यवस्था उच्च– मध्ये भरलेली असते.नकळत विकृती प्रकट होत राहते.पण बाबासाहेबांचं बोट धरून एक एक पाऊल टाकताना माणुसकीची खरी चव समजते. त्यातून अपराधीपणाचा निचरा होतो,नवी ओळख मिळते.ही कबुली केवळ वैयक्तिक नाही,तर सामाजिक आहे. कारण आजही असंख्य गावे,वाडे,वस्त्या हाच इतिहास घेऊन उभ्या आहेत.अनेक घरांच्या वैभवामागे दलितांचे श्रम दडलेले आहेत.ते मान्य करणं, त्याची लाज वाटणं आणि बदलासाठी पाऊल उचलणं–ही खरी क्रांती आहे.

आजच्या समाजासाठी धडा.

आजही आपण पाहतो की जातीय भिंती पूर्णपणे नाहीशा झालेल्या नाहीत. अस्पृश्यतेच्या उघड स्वरूपापेक्षा सूक्ष्म स्वरूपं समाजात जिवंत आहेत.शिक्षण, नोकरी,राजकारणात संधी मिळाल्या तरी सामाजिक वर्चस्व संपलेलं नाही. या पार्श्वभूमीवर पाटील यांचा लेख आरसा दाखवतो.जातिव्यवस्थेचा दोष फक्त त्यांनी लादला,असं म्हणणं सोपं आहे.पण त्यात आमचा सहभाग होता हे कबूल करणं कठीण आहे.हाच आत्मस्वीकार आज प्रत्येकाला करावा लागेल.तेव्हाच बाबासाहेबांचं कार्य खरं समजेल. बाबासाहेबांचे चिरंतन महत्त्व पाटील यांची शेवटची ओळ आम्ही खातो त्या भाकरीवरबी बाबासाहेबांची सही हाय रं ही थरारून टाकणारी आहे. कारण बाबासाहेबांच्या कार्याशिवाय आज आपल्याला मिळालेली लोकशाही,समानतेचं भान, शिक्षणाची दारे,सामाजिक प्रतिष्ठा–हे काहीच अस्तित्वात नसतं.आज प्रत्येकाने स्वतःला विचारायचं आहे!–आपण अजूनही नकळत जातिवादी आहोत का?. आपण बाबासाहेबांना केवळ प्रतीक म्हणून वापरतो का, की त्यांचा संदेश अंगीकारतो? दलित, वंचितांना समानतेने वागवणं हे खरं प्रायश्चित्त आहे का? सोमनाथ पाटील यांनी उघड केलेल्या सत्याने आपल्या अंतर्मनाला हादरवायला हवं. कारण बाबासाहेबांनी आपल्याला दिलेली शिकवण फक्त दलितांची मुक्ती नाही, तर संपूर्ण भारतीय समाजाच्या मानवतेची पुनर्स्थापना आहे.सोमनाथ पाटील यांचा हा लेख वाचताना वाटतं–आपल्या समाजाला अजून खूप मोठा प्रवास करायचा आहे.पण सुरुवात महत्त्वाची असते. दोष मान्य करणं,अपराधाची कबुली देणं,आणि बाबासाहेबांच्या विचारांकडे चालत राहणं–ही खरी माणुसकीची वाट आहे. आपण आज जे अन्न खातो,जे श्वास घेतो, जी लोकशाही उपभोगतो,त्या सगळ्यावर बाबासाहेबांची सही आहे. म्हणूनच त्यांना केवळ स्मारकांत बंदिस्त न ठेवता, आपल्या जीवनात जिवंत ठेवणं ही खरी कृतज्ञता ठरेल.

*********

रतनकुमार साळवे–९९२३५०२३२०
संपादक– दैनिक, निळे प्रतीक
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

# आर्थिक घसरण रोखण्यासाठी

चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जून दरम्यान, भारतीय कंपन्यांच्या महसुलातील वाढ मंदावून ती जेमतेम चार ते सहा टक्केच राहील, असा अंदाज 'क्रिसिल' या पतमानांकन संस्थेने वर्तवला आहे.

कंपन्यांच्या महसुलातील वाढ मंदावण्यास प्रामुख्याने ऊर्जा, कोळसा, आयटी सेवा, पोलाद या क्षेत्रांच्या कामगिरीत झालेला बिघाड कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. कंपन्यांच्या व्याज आणि करपूर्व महसुलात गेल्या वर्षाच्या तुलनेत चार टक्के वाढ होईल. याचवेळी व्याज आणि करपूर्व नफ्यात १० ते ३० आधारबिंदूंनी घट होण्याची शक्यता असल्याचे 'क्रिसिल'ला वाटते. त्यासाठी आयटी सेवा, वाहननिर्मिती, एफएमसीजी क्षेत्रातील कंपन्यांची असमाधानकारक कामगिरी कारणीभूत ठरेल. आधीच्या दोन तिमाहींमध्ये वाढीचा दर सात टक्के होता. ही घसरण चिंताजनकच बाब म्हणावी लागेल.

मोसमी पावसाचे वेळेआधी आगमन आणि भू राजकीय तणावामुळे निर्माण झालेली अनिश्चितता याचा परिणाम काही क्षेत्रांवर दिसून येणे अपेक्षित आहे. त्यात उन्हाळ्यातच पाऊस पडल्यामुळे विजेची मागणी कमी झाली. त्यामुळे ऊर्जा क्षेत्राच्या महसुलात गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ टक्के घट होऊ शकते. विजेची मागणी कमी असल्यामुळे तिच्या बरोबर कोळशाच्या मागणीतही घट झाली. रशिया–युक्रेन युद्ध, गाझा पट्टीतील इस्रायलचा धुमाकूळ आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याबरोबर झालेली अयशस्वी भेट याचाही फटका बसला आहे व यापुढेही बसण्याची शक्यता आहे.

अमेरिकेतील आयात शुल्कात वाढ होण्याच्या भीतीमुळे अनेक प्रकल्प लांबणीवर पडल्याचा परिणाम या कंपन्यांच्या कामगिरीवर होत आहे. अनेक निर्मिती प्रकल्पांमध्ये देखभालीसाठी नियोजित बंद पाळण्यात आले आहेत. त्यामुळे पोलादच्या किमतीतही घसरण झाली आहे. वाहननिर्मिती आणि बांधकाम क्षेत्राची वाढदेखील जेमतेम आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात ६.४ टक्क्यांपर्यंत वाढ होईल, असा होरा व्यक्त केला आहे. यापूर्वी त्यांनी त्यापेक्षा २० आधारबिंदूंनी कमी वाढ होईल, असे म्हटले होते; परंतु या नव्या अंदाजामुळे डोक्यात हवा जाण्याचे काही कारण नाही.

गेल्या महिन्यात देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएस या सर्वात मोठ्या कंपनीने तिच्या मनुष्यबळात दोन टक्क्यांच्या कपातीची योजना जाहीर केली. हे दोन टक्के प्रमाण म्हणजे तब्बल १२ हजार व्यक्तींच्या नोकर्या जाणार आहेत. गेल्या वर्षभरात म्हणजेच एकट्या २०२४ मध्ये जगभरातील ४२२ कंपन्यांनी १ लाख ३६ हजार कर्मचार्यांना नोकरीवरून काढून टाकले यात आयबीएम, इंटेल, सिस्को या बड्या कंपन्यांची नावे आहेत. या कंपन्याच अडचणीत आल्या असतील, तर इतर लहान–मोठ्या कंपन्यांची गोष्टच वेगळी.

त्याचबरोबर त्यांच्या सावलीखाली वाढलेल्या अनेक स्टार्टअप कंपन्यांनीदेखील आपल्या असंख्य कर्मचार्यांना घरी बसवले आहे. २०२५



मध्ये गूगल, कॉग्निझंट अॅपल डेल या कंपन्यांमध्ये एकाएकी नोकरीतून मुक्त करण्याची प्रक्रिया अनेक लोकांना अनुभवावी लागली आहे. ऑटोमेशन तसेच एआयमुळे नवनवीन तंत्रज्ञानात गुंतवणुकीची अपरिहार्यता एकीकडे, तर दुसरीकडे मंदावलेल्या वर्कऑर्डर्समुळे अनेक कंपन्यांच्या नफ्याच्या प्रमाणावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे उत्पादनखर्च घटवण्याचा एक भाग म्हणून, कमी कर्मचार्यांमधून जास्तीत जास्त काम करून घेतले जात आहे.

मात्र, केवळ जागतिक परिस्थितीला दोष न देता, व्यापार–उद्योगाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सरकारने पावले टाकली पाहिजेत. आजही भारतात नवीन उद्योग सुरू करणे, नवीन कंपनी स्थापणे, तोट्यातील कंपनी बंद करणे या गोष्टी सोप्या नाहीत. एक खिडकी योजना, ईझ ऑफ डुइंग बिझिनेस वगैरे कितीही गप्पा मारल्या, तरी प्रत्यक्षात उद्योजकांना येणार्या अडचणी असंख्य आहेत. खालच्या पातळीवरचा भ्रष्टाचार अजिबात कमी झालेला नाही. वेगवेगळे परवाने, मंजुर्या घेण्यास आजही पैसे चारावे लागतात.

भारतात वस्तू व सेवा कर, म्हणजेच जीएसटीचा शुभारंभ होऊन १ जुलै रोजी आठ वर्षे पूर्ण झाली. जीएसटी म्हणजे 'एक देश एक कर' असे त्याचे मूळ स्वरूप अपेक्षित होते. प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. या कराची अंमलबजावणी सुरू झाली, तीच मुळी ०, ५, १२, १८, २८ टक्के आणि त्याखेरीज अधिभार अशी. म्हणजे करदराच्या कमीत कमी पायर्या असाव्यात, या तत्त्वालाच आपण पहिल्यापासून तिलांजली दिली आहे. आजपर्यंत जीएसटीसंबंधी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली ५५ बैठका झाल्या असून, अद्यापही या करातील गुंतागुंत कमी झालेली नाही. १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना दिवाळीत मोठी भेट मिळेल, जीएसटीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्यात येतील व त्यातून लोकांना व उद्योगांना मोठ्या प्रमाणावर करसवलती मिळतील, असे म्हटले होते.

केंद्र सरकारने १२% आणि २८% या स्लॅब रद्द करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यापासून या करात २७ वेळा बदल करण्यात आले, तर पंधरा वेळा विविध वस्तूंवरील कर कमी करण्यात आले. मात्र ज्या वस्तूंवर सध्या २८ टक्के कर तो आता १८ टक्क्यांवर येईल, असा अंदाज आहे. यामध्ये मोटरसायकल, सायकल, काही ट्रॅक्टर्स, विजेवर चालणारी सिंचन उपकरणे, एसी, पंखे आणि इतर उत्पादनांचा समावेश आहे. तसेच १२ टक्क्यांचा स्लॅब बंद झाल्यास, त्या अंतर्गत येणार्या वस्तू, म्हणजे कंडेन्स्ड मिल्क, बटर, तूप, चीज स्प्रेड, खजूर जॅम, फ्रूट जेली, नट्स, डायबेटिक फूड, उपचारांसाठी वापरला जाणारा ऑक्सिजन वगैरेंबाबत याप्रकारे करकपात लागू झाल्यास, मागणी वाढून अर्थव्यवस्थेस पुन्हा एकदा उभारी येईल, अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकारने लवकरात लवकर या दिशेने ठोस पावले टाकावीत.

# अमेरिकेची वसुली

अमेरिकेने भारतावर ५०% जादा जे आयात शुल्क लावले आहे त्याची अंमलबजावणी आता सुरू होत आहे. अमेरिकेने भारताकडून सुरू केलेली ही वसुली आहे. या ५० टक्क्यांपैकी २५% आयात कर हा दंडात्मक स्वरूपाचा आहे. रशियाकडून भारताने कच्चे तेल आयात करणे थांबवावे अशी सूचना अमेरिकेने या आधीच दिली होती, तरीही भारताने ती आयात सुरू ठेवल्याने हा २५% चा जादाचा भुर्दंड भारताला सोसावा लागत आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे भारतातील निम्म्याहून अधिक औद्योगिक क्षेत्रावर विपरीत परिणाम होणार आहे. त्यात ज्वेलरी, रसायने, कृषिमाल, मरीन प्रोडक्ट्स, छोट्या उद्योगातून निर्माण होणारी उत्पादने, टेक्सटाइल अशा सर्व क्षेत्रातील उत्पादनाच्या निर्यातीवर विपरीत परिणाम होणार आहे.

आता या सगळ्या आपत्तीला भारत सरकार कसे तोंड देणार हे पाहणे महत्त्वाचे आहे. आयात निर्यात क्षेत्रातील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार या आपत्तीला तोंड देण्यासाठी काही पर्याय भारताकडे उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिला पर्याय म्हणजे अमेरिकेतून भारतात ज्या वस्तू आयात होतात त्याच्यावरचा आयात कर भारतानेसुद्धा वाढवला पाहिजे, म्हणजे अमेरिकेला त्यांच्याच भाषेत उत्तर देण्याचा मुख्य पर्याय आपल्यापुढे उपलब्ध आहे. पण हा पर्याय स्वीकारण्याइतका भारत सक्षम आहे काय असा प्रश्नही या क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित करीत आहेत. अमेरिका ही मोठी अर्थव्यवस्था आहे, त्या तुलनेत भारत अगदीच लहान अर्थव्यवस्था असून भारताला हा पर्याय परवडणारा नाही असे काहींचे म्हणणे आहे. त्यातही मोदी हे ट्रम्प प्रशासनाच्या दबावाखाली असल्याने ते असे धाडस करू शकणार नाहीत असेही काहींचे म्हणणे आहे.

दुसरा पर्याय असा आहे की भारताने अमेरिका वगळता अन्य देशांबरोबरचा आपला व्यापार वाढवला पाहिजे आणि त्यातून ही तूट भरून काढली पाहिजे. पण हे काही इतक्यात शक्य होण्यातले नाही. तिसरा पर्याय भारताने आत्मनिर्भर होणे हा आहे. पण निर्यातच मंदावली तर त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर जे विपरीत परिणाम होणार आहेत ते भरून काढण्यासाठी आत्मनिर्भरतेवर किती जोर द्यायचा याच्यावरसुद्धा मर्यादा आहेत. अमेरिकेने जे ५० टक्क्यांचे आयात शुल्क लावले आहे त्यातून ४५% वस्तू वगळल्या गेल्या असून केवळ ५५% वस्तूंवर हा अतिरिक्त भार लागणार आहे, त्यामुळे थोड्याशा नीट आर्थिक व्यवस्थापनानंतर भारताला हे नुकसान भरून काढणे अवघड नाही, असेही काही जणांचे म्हणणे पडते.

अगदी आजपासूनच हे नवीन आयात शुल्क लागू होणार असल्याने भारतीय अर्थक्षेत्रात आणि उद्योग क्षेत्रात धास्तीचे वातावरण आहे. त्यातून भारतीय रुपयाचे मूल्य आणखीन घसरण्याची शक्यता असून, त्याचे अन्यही काही दूरगामी विपरीत परिणाम देशाला भोगावे लागतील. या परिणामातून भारतीय उद्योग सावरावा यासाठी भारतीय उद्योगांना अधिक सबसिडी देण्याचा पर्यायसुद्धा केंद्र सरकारकडे उपलब्ध आहे; परंतु खर्चाच्या बाबतीत नेहमीच हात आखडता घेणार्या मोदी सरकारकडून याबाबत फार मोठी अपेक्षा करता येत नाही. या सरकारने सबसिडी देण्याबाबत नेहमीच काटकसर केली असून सध्या देशात विविध मालावर जी सबसिडी दिली जाते त्यातच कपात करण्याचा प्रयत्न मोदी सरकारकडून वेळोवेळी झाला आहे. त्यामुळे अमेरिकेने लावलेल्या करातून अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी मोदी सरकार भारतीय उद्योगाला अधिकची सबसिडी देईल असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. अमेरिकेकडून सुरू होणार्या अतिरिक्त कर वसुलीचे विपरीत परिणाम देशात दिसू लागले आहेत. नोएडा, सुरत आदी ठिकाणी अनेक वस्त्रोद्योग कंपन्यांनी आपली उत्पादने थांबवली आहेत. या उत्पादकांना मोदी सरकारची सबसिडी कधी सुरू होणार हा प्रश्न आतापासूनच विचारला जाऊ लागला आहे. अमेरिकन वसुलीच्या या समस्येवर एक तातडीची उपाययोजना मोदी सरकारला करता येणे सहज शक्य आहे, ती म्हणजे रशियाकडून केली जाणारी तेल आयात तातडीने थांबवली पाहिजे.

त्यामुळे भारतावर जो २५ टक्क्यांचा अतिरिक्त दंडात्मक भार लावला गेला आहे तो थांबू शकतो. पण मोदी सरकार हा पर्याय तरी स्वीकारणार का हा मुख्य प्रश्न आहे. कारण, रशियाकडून आयात केल्या जाणार्या तेलाचा सर्वाधिक फायदा मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स रिफायनरीलाच अधिक झालेला दिसला आहे. केंद्र सरकारने रशियाकडून आयात केले जाणारे जवळपास ८०% तेल हे सरकारी तेल कंपन्यांना न देता खासगी कंपन्यांना दिले आहे. त्यातून या खासगी कंपन्यांनी तब्बल १६ अब्ज डॉलरचा नफा कमवला आहे असे सांगितले जाते. या खासगी कंपन्यांच्या नफ्यासाठी संपूर्ण देशाने अमेरिकेचा जादाचा २५% करांचा दंडात्मक भार का सोसावा हा प्रश्न आहे.

जर हे तेल सरकारी तेल कंपन्यांना मिळत असते आणि त्यातून भारतीय नागरिकांच्या इंधन दरामध्ये सवलत मिळाली असती तर हा दंडात्मक भार सरकारने सोसणे अवघड नव्हते. पण रशियन तेल आयातीचा लाभ खासगी कंपन्यांना आणि त्याच्या दंडात्मक कारवाईचा तोटा मात्र संपूर्ण देशाला का सोसावा लागत आहे हा प्रश्न आता मोदी सरकारला विचारण्याची गरज आहे. अमेरिकेने केवळ भारतावरच नव्हे तर संपूर्ण जगातील अनेक देशांवर असा अतिरिक्त कर भार लागू केला आहे असा युक्तिवाद करून सरकारला स्वतःची सुटका करून घेता येणार नाही. चीन आणि कॅनडा यासारख्या देशांनी अमेरिकन मालाच्या आयातीवरही तितक्याच प्रमाणात अतिरिक्त कर भार लावून अमेरिकेला जशास तसे उत्तर दिले आहे, पण भारत अजूनही हे पाऊल उचलताना दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर आता भारताने चीनशी सलगी वाढवून त्यांच्याबरोबर अधिक खुल्या प्रमाणात व्यापार करायचे ठरवले आहे. खरं म्हणजे ही उपाययोजना खूप पूर्वीच करता येणे शक्य असताना भाजप सरकारने चीनच्या विरोधात देशातील नागरिकांच्या मनात वेगळ्याच धास्तीचे वातावरण करून चीनकडून मदत घेण्यास किंवा त्यांच्याशी व्यापार करायला विरोध दर्शवला होता.

# महाबळेश्वरला पावसाची मजा घेण्यासाठी निघाले, अचानक रानात रडण्याचा आवाज आणि तिने त्याला

पावसाचा जोर वाढला होता. या वाढत्या कोसळधारेत घरी बसून फक्त चहा आणि भजीने काम चालवणे ठीक नाही. त्यामुळे रमेशला एक भन्नाट आयडिया आली. रमेशने त्याच्या प्रेयसीला तात्काळ फोन केला. त्याने तिला या सुंदर वातावरणाला अनुभवण्यासाठी महाबळेश्वरची सफर करूयात असे सांगितले. नेहा त्याच्या म्हणण्याला लगेच राजी झाली. या प्लॅनमध्ये रमेशचा मित्र वरुणही शामिल होता. तसेच पनवेलला वरुणची प्रेयसी संगीता त्या सगळ्यांना जॉईन करणार होती.

रात्री जेवण वगैरे आटपून रमेश, नेहा आणि वरुण भायखळ्याहून महाबळेश्वरकडे रवाना होतात. वाटेत त्यांना संगीता येऊन मिळते. चौघे अगदी वाऱ्याच्या वेगाने महाबळेश्वरच्या दिशेने जात असतात. रस्त्याला वाहनांची जास्त गर्दळ नव्हती. पावसाचा वेगही तसा मंदावत जात होता. मध्यरात्रीचे २ वाजत असताना गाडी एका घाटामध्ये असते. ते महाबळेश्वरच्या अगदी जवळ पोहचले असतात. अशात वरुणला जोरात वॉशरूमला होते. तो रमेशला रस्त्याच्या शेजारी गाडी घेण्यासाठी सांगतो. गाडी अगदी घाटमाथ्यावर असते. वरुण रस्त्याच्या किनाऱ्यावर जाऊन त्याचे कार्यक्रम पूर्ण करतो.

दरम्यान, तो रमेशला जोरात हाक देतो आणि म्हणतो तुम्हाला कुणाच्या रडण्याचा आवाज येतोय का? कुणीतरी रडतेय इथे रमेश म्हणतो सोड रे, तू तुझं काम पूर्ण कर आणि ये पटपट!' पण वरुणच्या मनात विचारांची पाल कुजबुजत असते. त्यात गाडीमध्ये त्या तिघांची चर्चा सुरु होते. अशामध्ये वरुणला बाहेर जाऊन फार वेळ झाल्याने रमेश वरुणच्या दिशेने पाहतो. ते दृश्य पाहून रमेशच्या अंगातून घामाच्या धारा निघतात. कारण वरुण दूरदूरपर्यंत कुठेच दिसत नसतो. रमेश तसाच गाडीमधून उतरतो. धावत धावत त्या ठिकाणी जातो. तिथे आजूबाजूला कुणी त्याला दिसत नाही. थोडा पुढे जाऊन रमेश त्याला शोधण्याचा प्रयत्न करतो पण त्याला फार दूरवर एक गर्दी प्रकाशझोत हातात घेऊन चालताना दिसते. रमेशला तिथे जाण्याचे धाडस होत नाही. तो घाबरून गाडीकडे वळतो. गाडीकडे जाऊन पाहतो तर काय? वरुण गाडीमध्ये बसलेला असतो. नेहा रमेशवर भडकते. म्हणते तू वेडा आहेस का? या रात्री रानात फिरणे तुला मज्जा वाटते? तोंडावर बारा वाजलेले असणारा रमेश वरुणकडे पाहतो आणि त्याला विचारतो तू कधी आला? तेव्हा नेहाचं त्याला उतरते ए, आंधळ्या. तू जसा गेला तसा तुझ्या बाजूनेच आला होता तो. आम्ही तुला इतके आवाज दिला. तू ना आम्हाला ऐकलं ना पाहिलं. बस आता गाडीमध्ये! रमेशच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह पडला होता. चौघे अगदी तासाभरात महाबळेश्वरला एका हॉटेलमध्ये येऊन ठेपले.

दुसरा दिवस उजडला. रमेशने एक गोष्ट लक्षात घेतली की वरुणच्या वागण्यात बदल झालाय. तो शांत शांत आहे. चौघे मॅप्रो गार्डनकडे रवाना होतात. त्यांच्या हॉटेलकडून मॅप्रो गार्डनकडे जाणारा रस्ता तसा २० मिनिटांवर आहे. ते चौघे मॅप्रो गार्डनकडे रवाना होतात. दरम्यान, ते अशा एका ठिकाणावर थांबतात जेथून संपूर्ण लोणावळा परिसर पाहता येतो. चौघे तिथे उतरतात. मज्जा करतात पण त्यात वरुण फार गुमसुम असतो. काल ते प्रकरण घडल्यापासून रमेशही त्याच्यावर लक्ष देत असतो, त्यालाही हे जाणवते की वरूनच काय तरी बिनसलंय. त्याच्यात फार बदल जाणवतोय. तिथे गोंधळ घालून हे चौघे मॅप्रो गार्डनच्या दिशेने निघाले.



गाडीत असताना रमेशची नजर मागे बसलेल्या वरुणवरच होती. पण या प्रवासात त्यांच्यासोबत असं घडलं, जे विचारांच्या पलीकडे होते. रमेश गाडी चालवत असतो. ज्या ठिकाणी ते आधी थांबले होते. ते ठिकाण वारंवार पुन्हा पुन्हा त्यांना दिसत होते. गाडी त्याच ठिकाणी गोल फिरत होती. जणू काही त्यांना चकवाच लागला होता. रमेश, नेहा तसेच संगीता फार घाबरलेले होते पण रमेशचे लक्ष वरुणवर जाते. जेव्हा ते ठिकाण गाडीशेजारी येते, वरुणच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद येतो. रमेशला खात्री बसते, की दाल में कुछ काला है! इतक्यात एक गाडी त्यांच्या शेजारून जाते, त्या गाडीचा पाठलाग करत ती लोकं चकव्यातून सुटतात.

चौघे मॅप्रो गार्डनला असतात. फिरत असताना अचानक रमेशला पोलिसांचा कॉल येतो. त्या कॉलवर झालेले संभाषण ऐकून रमेशच्या पायाखालची जमीन सरकते. पोलीस त्याला म्हणतात की तुमचा मित्र वरुण घाटाच्या रस्त्याच्या शेजारी बेशुद्ध अवस्थेत सापडला आहे. कॉल झाल्यावर कुणाला काही न सांगता, रमेश वरुणचा शोध घेतो पण वरुण तिथे कुठेच भेटत नाही जणू तो अचानक गायब झालेला असतो. रमेश हे प्रकरण सगळ्यांना सांगतो. सगळे अगदी घाबरून जातात, मग तो कालपासून आपल्यासोबत होता तो कोण होता? असा प्रश्न सगळ्यांच्या डोक्यात नांदत असतो.

सगळी कामे तसेच सोडून ती तिघे त्या ठिकाणावर येऊन पोहचतात. वरुण पोलिसांसोबत असतो. वरुणला काय झाले विचारले असता, तो इतकेच सांगतो की, मी त्या बाईच्या रडण्याच्या आवाजच्या दिशेने गेलो. झाडावर ती बसली होती. हळहळू माझ्याजवळ आली. नंतर मला काहीच आठवत नाही. रमेश म्हणतो ठीके. झालं ते विसरायचा प्रयत्न कर. तू काहीच मज्जा केली नाही. आता आलाच आहेस शुद्धीत! तर पुन्हा महाबळेश्वरला जाऊ किमान १ दिवस तरी काढू. सगळे महाबळेश्वरला जातात. एक दिवस पूर्ण धमाल करतात. आता परतीचा प्रवास येतो.

संध्याकाळच्या सुमारास ते चौघे त्याच घाटातून प्रवास करत असतात. प्रवासादरम्यान अचानक रमेशला वॉशरूमला होते. तो कुणाला काही न सांगता गाडी रस्त्याच्या शेजारी घेतो. वरुण गाडीच्या बाहेर पाहतो तर काय? हे तेच ठिकाण होते, जिथे तो बेशुद्ध पडला होता. तो रमेशला आवाज देत असतो पण रमेशला काहीच ऐकू जात नाही. रमेश आरामात त्याचा कार्यक्रम करत असतो. इतक्यात रमेशला कुणी तरी रडतानाचा आवाज ऐकू येतो

## पदार्थाला द्या हटके टच, यंदा ओरिओ बिस्किटांपासून बनवा चविष्ट मोदक

गणेश चतुर्थी म्हणजे आनंद, उत्साह आणि भक्तीचा सण. बाप्पाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत प्रत्येक घरात गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. गणरायांना मोदक हा अत्यंत प्रिय नैवेद्य मानला जातो. पारंपरिक उकडीचे मोदक तर प्रत्येक घरात होतातच, पण आजच्या पिढीला थोडंसं हटके आणि झटपट बनणारे मोदक आवडतात. विशेषत: लहान मुलांना ओरिओ बिस्किट खूप आवडतात, त्यामुळे ओरिओ बिस्किट मोदक हा एक उत्तम पर्याय ठरतो. या मोदकात पारंपरिक चव आणि आधुनिक ट्विस्ट एकत्र येतात.

जेवणासाठीचा मसालेदार मेन्यू! घरी बनवून तर पहा पंजाबी स्टाईल चमचमीत छोले भटुरे

ओरिओ बिस्किट मोदकाची खासियत म्हणजे हे मोदक बनवायला अगदी कमी वेळ लागतो, गॅसवर उकड काढण्याची किंवा जास्त परिश्रम करण्याची गरज नसते. शिवाय हे मोदक स्वादिष्ट, कुरकुरीत आणि आकर्षक दिसतात. गणरायांना नैवेद्य म्हणून अर्पण करण्यासाठी ही रेसिपी उत्तम आहे आणि घरातील सगळ्यांनाच आवडणारी आहे. चला तर मग जाणून घेऊया ओरिओ मोदक बनवण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य :




ओरिओ बिस्किट – २५ ते ३०

दूध – ट कप (गरजेनुसार)

तूप – २ टेबलस्पून

साखर पावडर – २ टेबलस्पून (ऐच्छिक)

सुके मेवे (काजू, बदाम, पिस्ते – बारीक चिरलेले) – २ टेबलस्पून

किसलेला नारळ – २ टेबलस्पून (ऐच्छिक, चव वाढवण्यासाठी)

मोदकाचा साचा

कृती : यासाठी सर्वप्रथम ओरिओ बिस्किटाचे क्रीम वेगळे करून घ्या.

बिस्किट मिक्सरमध्ये टाकून बारीक पावडर करून घ्या.

एका पॅनमध्ये तूप गरम करून त्यात बिस्किटाची पावडर टाका आणि मंद गॅसवर छान परता.

आता त्यात दूध थोडं-थोडं घालून मऊसर मिश्रण तयार करा.

साखर पावडर, बारीक चिरलेले सुके मेवे आणि नारळ घालून सर्व मिश्रण चांगले एकत्र करा.

गॅस बंद करून मिश्रण थंड होऊ द्या.

आता मोदकाच्या साच्याला तूप लावून त्यात हे मिश्रण भरून मोदकाचे आकार द्या.

सर्व मोदक तयार करून छान प्लेटमध्ये सजवा.

मोदक अधिक स्वादिष्ट करण्यासाठी बिस्किटातील क्रीम मिश्रणात घालू शकता.

जर मोदक घट्ट होत नसतील तर थोडंसं दूध किंवा तूप वाढवू शकता. मुलांना आवडण्यासाठी वरून चॉकलेट सिरप किंवा ड्रायफ्रूट्सने सजावट करा.

हे चविष्ट ओरिओ बिस्किट मोदक गणरायांना नक्कीच प्रिय पडतील आणि घरातील सगळ्यांना आवडतील.

## चहाशिवाय जगू शकत नाही का? १ मोठी चूक आणि Cancer धोका, वैज्ञानिकांनी दिला इशारा; ३ लक्षणं जीवघेणी

चहा हे भारतात सर्वात जास्त सेवन केले जाणारे पेय आहे. बहुतेक लोक दिवसाची सुरुवात गरम चहाने करतात. अर्थात, गरम चहा आरामदायी असतो, पण तुम्हाला माहिती आहे का की ही एक चूक तुम्हाला कर्करोगाचा रुग्ण बनवू शकते? शास्त्रज्ञांनी एका संशोधनात असे आढळून आले आहे की गरम चहा पिल्याने अन्ननलिकेचा कर्करोग होऊ शकतो. राष्ट्रीय आरोग्य संस्थेत प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात शास्त्रज्ञांनी म्हटले आहे की जर तुम्ही ६५ओउ (१४९ओऋ) पेक्षा जास्त तापमानाचा चहा किंवा इतर पेये प्यायली तर ती केवळ जीभ जळत नाही तर अन्ननलिकेतील कर्करोगाचा धोकादेखील वाढवू शकते. WHO चा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) देखील यावर सहमती दर्शविली आहे.





संघटनेने खूप गरम पेये मानवांसाठी कर्करोगजनक मानली आहेत. याचा अर्थ असा की जर एखादी व्यक्ती वारंवार खूप गरम पेये पित असेल तर त्याला अन्ननलिकेचा कर्करोग होऊ शकतो.

चहा पिण्याने कसे होते नुकसान शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की खूप गरम पाणी, चहा किंवा कॉफी अन्ननलिकेच्या अस्तरांना जळजळ करते. वारंवार जळजळ झाल्यामुळे जळजळ होते आणि पेशींमध्ये बदल होतात. हा बदल हळूहळू कर्करोगाचे रूप धारण करू शकतो. त्यामुळे तुम्ही जर सतत चहा पित असाल तर ते त्वरीत बंद करा आणि स्वतःच्या सवयीवर नियंत्रण आणा. चहा हेदेखील एक व्यसनच आहे. कर्करोगापासून दूर रहायचे असेल तर ही सवय वेळीच बदला गरम पेयांमुळे कोणत्या प्रकारचा कर्करोग होऊ शकतो? अन्ननलिकेमध्ये दोन मुख्य प्रकारचे कर्करोग आहेत.

## आतड्यांमध्ये चिकटलेली घाण क्षणार्धात होईल स्वच्छ! पोट साफ होण्यासाठी दुधात मिक्स करून प्या 'हे' पदार्थ


कायमच पोटाच्या आरोग्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. आहारात तिखट किंवा तेलकट पदार्थ खाणे, सतत चिकन मटण खाणे, मसालेदार पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे शरीराला हानी पोहचते. यामुळे गॅस, अपचन आणि ॲसिडिटी वाढते. याशिवाय हल्ली प्रत्येक व्यक्ती बद्धकोष्ठतेच्या समस्येने त्रस्त आहेत. बद्धकोष्ठता झाल्यानंतर शरीरात विषारी घाण तशीच साचून राहते. पाण्याच्या कमतरतेमुळे आणि शारीरिक हालचालींमुळे आतड्यांमधील घाण बाहेर पडून जाण्यास अनेक अडथळे निर्माण होतात. याशिवाय पोट स्वच्छ न झाल्यामुळे मल अतिशय कठीण होऊन आतड्यांमधये तसाच साचून राहतो.यामुळे गुदाशयात वेदना, रक्त येणे किंवा मूळव्याध होण्याची जास्त शक्यता असते. मूळव्याध झाल्यानंतर शरीरामध्ये अनेक बदल दिसून येतात.(फोटो सौजन्य – ळींलज्ञ)

पचनक्रिया बिघडल्यानंतर शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य सुद्धा बिघडून जाते. यामुळे जडपणा जाणवतो, डोकेदुखी, चिडचिड, तणाव, उलट्या, मळमळ इत्यादी समस्या उद्भवू लागतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला आतड्यांमध्ये चिकटून राहिलेली घाण स्वच्छ करण्यासाठी दुधात कोणते पदार्थ मिक्स करून खावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पदार्थांच्या सेवनामुळे शरीर स्वच्छ होते आणि आतड्यांमधील घाण बाहेर पडून जाते. पचनक्रिया कायमच निरोगी ठेवण्यासाठी दुधात हे पदार्थ मिक्स करून खावेत.

दूध आणि तुपाचे मिश्रण: तूप खाल्यामुळे शरीर हायड्रेट राहते. याशिवाय गोड पदार्थ बनवताना तुपाचा वापर केला जातो. शरीरातील घाण बाहेर पडून जाण्यासाठी रात्री झोपण्याआधी एक ग्लास दुधात तूप मिक्स करून प्यावे. यामुळे पचनक्रिया निरोगी राहील. तुपाच्या सेवनामुळे मल मऊ होऊन आतड्यांमधील घर्षण कमी होते. याशिवाय सकाळी उठल्यानंतर सुद्धा तुम्ही दूध आणि तुपाचे सेवन करू शकता.

खजूर: नैसर्गिक गोडवा असलेले खजूर शरीरासाठी अतिशय गुणकारी आहेत. नियमित एक किंवा दोन खजूर खाल्यास आतड्यांचे कार्य सुधारण्यास मदत होते. याशिवाय खजूरमध्ये नैसर्गिक लॅक्सेटिव्ह, सॉर्बिटॉल इत्यादी घटक आढळून येतात. त्यामुळे दिवसभरातून ३ किंवा ४व खजूर खावे. यामुळे अपचन किंवा बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवणार नाही.





कोरफड: शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी कोरफड अतिशय प्रभावी ठरते.

सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी नियमित एक किंवा अर्धा ग्लास कोरफडचा रस प्यायल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जातील. याशिवाय आतड्यांमध्ये साचलेला मल बाहेर पडून जाईल. कोरफडमध्ये अँथ्राक्विनोन्स सारखे लॅक्सेटिव्ह इत्यादी आवश्यक घटक असतात.

F-Qs (संबंधित प्रश्न) बद्धकोष्ठता म्हणजे काय? बद्धकोष्ठता म्हणजे मलत्याग करण्याची अनियमितता किंवा मलत्याग करताना होणारा त्रास. आठवड्यातून पेक्षा कमी वेळा मलविसर्जन होणे किंवा मलत्याग करताना जास्त जोर लावावा लागणे, याला बद्धकोष्ठता म्हणतात.

बद्धकोष्ठतेवर घरगुती उपाय: पुरेसे पाणी प्यायल्याने मल मऊ होतो आणि मलत्याग करणे सोपे होते. आहारात फायबरचे प्रमाण वाढवा, जसे की फळे, भाज्या, आणि धान्ये. नियमितपणे व्यायाम केल्याने आतड्यांची हालचाल सुधारते.

## जेवणासाठीचा मसालेदार मेन्यू! घरी बनवून तर पहा पंजाबी स्टाईल चमचमीत छोले भटुरे

जेवणासाठी तेच तेच बनवून खाल्लं की एका क्षणी त्या बोरिंग जेवणाचा कंटाळा येऊ लागतो आणि काहीतरी नवीन चवदार खाण्याची इच्छा होऊ लागते. म्हणूनच आज आम्ही तुमच्यासाठी जेवणाचा एक खास आणि मसालेदार मेन्यू घेऊन आलो आहोत ज्याने घरातील सर्वच मंडळी होतील खुश. आज आपण जाणून घेणार आहोत पंजाबी स्टाईल छोले भटुरेची एक सोपी आणि चविष्ट रेसिपी!

भारतीय पाककृतीत पंजाबी पदार्थांची चव वेगळीच असते. त्यातही छोले भटुरे हा पदार्थ धाब्यावर खाल्ला की त्याची मजा काही औरच! मसालेदार छोले, त्यावर घातलेले कांदा-लिंबू आणि सोबत गरमागरम फुगलेले भटुरे – असा भन्नाट कॉम्बिनेशन सकाळच्या नाश्त्याला किंवा खास जेवणात खाल्लं की मन तृप्त होतं. चला तर मग, धाबा स्टाईल छोले भटुरे कसे बनवायचे ते पाहूया.

साहित्य :

छोले साठी –

काबुली चणे – २ कप (रात्रभर भिजवलेले)

कांदा – २ मध्यम (बारीक चिरलेले)

टोमॅटो – २ मोठे (पेस्ट करून)

आलं-लसूण पेस्ट – १ टेबलस्पून

हिरवी मिरची – २ (चिरलेली)

चहा पत्ती – १ टेबलस्पून (कापडात बांधून)

तेल – ३ टेबलस्पून

हिंग – चिमूटभर

जिरे – १ टीस्पून

धने पूड – २ टीस्पून

गरम मसाला – १ टीस्पून

लाल तिखट – १ टेबलस्पून

चाट मसाला – १ टीस्पून

मीठ – चवीनुसार

कोथिंबीर – सजावटीसाठी

भटुरे साठी –

मैदा – २ कप

रवा – २ टेबलस्पून

दही – ट कप

बेकिंग पावडर – ट टीस्पून

बेकिंग सोडा – ञ टीस्पून





मीठ – चवीनुसार

तेल – १ टेबलस्पून (आटवण्यासाठी)

पाणी – आवश्यकतेनुसार

तळण्यासाठी तेल

रोजच्या वरण-भाताची वाढेल सुंदर चव! १५ मिनिटांमध्ये घरी बनवा ढाबास्टाईल दाल फ्राय, नोट करा रेसिपी

कृती :

छोले बनवण्यासाठी –

यासाठी सर्वप्रथम भिजवलेले काबुली चणे प्रेशर कुकरमध्ये चहा पत्तीचे पोटळं टाकून शिजवून घ्या.

कढईत तेल गरम करून त्यात जिरे, हिंग, हिरवी मिरची व आलं-लसूण पेस्ट टाकून परता.

कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या आणि नंतर टोमॅटो पेस्ट टाका.

मसाले (धने पूड, लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला) घालून छान परता.

उकडलेले चणे मसाल्यात घालून ५-७ मिनिटे झाकून ठेवा.

वरून कोथिंबीर टाकून गॅस बंद करा. भटुरे बनवण्यासाठी –

यासाठी सर्वप्रथम मोठ्या भांड्यात मैदा, रवा, दही, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, मीठ आणि तेल एकत्र करा. पाणी घालून मऊसर पीठ भिजवा. झाकून २ तास ठेवा. पीठाचे छोटे गोळे करून पोळीसारखे लाटून घ्या.

कढईत तेल गरम करून भटुरे फुगवून सोनेरी रंग येईपर्यंत तळा.


गरमागरम धाबा स्टाईल छोले प्लेटमध्ये वाढा, वरून कांदा व लिंबाच्या फोडी ठेवा आणि सोबत फुगलेले गरम भटुरे द्या.

## शेफ कुणाल कपूर स्पेशल रेसिपी! १५ मिनिटांमध्ये घरच्या घरी बनवा मुंबई स्पेशल मसाला पाव, चवीला लागेल स्ट्रीट सारखी

मुंबईचा वडापाव आणि स्ट्रीट स्टाईल मसाला पाव अतिशय फेमस पदार्थ आहे. या पदार्थांची नाव ऐकताच तोंडाला पाणी सुटते. मुंबईच्या स्ट्रीटवर मिळणारे चविष्ट पदार्थ अतिशय आवडीने खाल्ले जातात. नेहमीच संध्याकाळच्या नाश्त्यात किंवा इतर वेळी भूक लागल्यानंतर काहींना काही चमचमीत पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. अशावेळी बाहेरून विकत आणलेले तेलकट पदार्थ खाल्ले जातात. पण आज आम्ही तुम्हाला सेलिब्रिटी शेफ कुणाल कपूर यांनी शेअर केलेली मसाला पाव बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. कुणाल कपूर त्यांच्या सोशल मीडियावर सतत काहींना काही नवनवीन रेसिपी शेअर करत असतात. कमीत कमी साहित्यामध्ये अतिशय सोप्या पद्धतीमध्ये तयार होणाऱ्या रेसिपी सगळ्यांचं खूप जास्त आवडतात. चला तर जाणून घेऊया मुंबई स्पेशल मसाला पाव बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:





पाव

कांदा

टोमॅटो

पावभाजी मसाला

लाल तिखट मसाला

हळद

मीठ

बटर

आलं लसूण पेस्ट

कोथिंबीर

कृती: मसाला पाव बनवण्यासाठी सर्वप्रथम, गरम तव्यावर तेल किंवा बटर गरम करून घ्या. त्यानंतर त्यात जिरं टाकून भाजा.

नंतर बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो आणि शिमला मिरची टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. कांद्यामध्ये चवीनुसार मीठ टाका.

टोमॅटो कांदा शिजल्यानंतर त्यात आलं लसूण पेस्ट टाकून व्यवस्थित भाजून घ्या.

त्यानंतर त्यात लाल तिखट, हळद, गरम मसाला, पावभाजी मसाला टाकून व्यवस्थित भाजून घ्या. थोडस पाणी टाकून भाज्या शिजवा.

मसाल्यांमध्ये बारीक बारीक तुकडे केले पाव टाकून व्यवस्थित मिक्स करा आणि ५ मिनिट झाकण मारून ठेवा.

सगळ्यात शेवटी बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून मसाला पाव खाण्यासाठी सर्व्ह करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले मसाला पाव. हा पदार्थ घरातील सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

# युवा गणेश मंडळ बावलगाव तर्फे अंधश्रद्धा निर्मूलन आणि कायदा सुव्यवस्थेवरील प्रेरणादायी कार्यक्रम

बिलोली / प्रतिनिधी :– तालुक्यातील बावलगाव येथे युवा पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करण्यासाठी, समाजातून अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आणि कायदा–सुव्यवस्थेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी युवा गणेश मंडळ बावलगाव यांच्या वतीने एक भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव मा. कमलाकर जमदडे यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग सादर करून अंधश्रद्धा निर्मूलनाविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी तरुणाईला विज्ञानाधिष्ठित विचार स्वीकारण्याचे, विवेक जागवण्याचे आणि खरी प्रगती साधण्याचे प्रेरणादायी आवाहन केले.कार्यक्रमात पोलीस ठाणे बिलोली येथील पोलीस उपनिरीक्षक शिवराज लोखंडे यांनी कायदा–सुव्यवस्थेबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांनी कायद्याचे पालन करून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, समाजातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सकारात्मक भूमिका बजवावी, असे आवाहन त्यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून बालाजी एलगंद्रे यांची उपस्थिती लाभली.



युवा गणेश मंडळ बावलगावचे पदाधिकारी व सदस्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहाने केले. पदाधिकारी व सदस्यांमध्ये अध्यक्ष शंकर गंगाधर पटने, उपाध्यक्ष राजू गंगाधर तुकडेकर, सचिव अंकुश मारोती मदनुरे, सहसचिव विठ्ठल गंगाराम छपेवार, कोषाध्यक्ष मारोती गंगाराम छपेवार यांचा समावेश होता. सदस्यांमध्ये प्रदीप लक्ष्मणराव ठोमसे, माणिक सायगोंडा श्रीगीरे, साईनाथ हनमंत छपेवार, नागनाथ गंगाराम छपेवार, विनोद हनमंत ठोमसे, मारोती रमेश छपेवार, बालाजी हनमंत शिरगीरे, गहिनीनाथ हनमंत छपेवार, प्रभू लच्छिराम शिरगीरे, नागनाथ दशरथ छपेवार, इरेश भुमन्ना ठोमसे यांचा सहभाग होता.कार्यक्रमाला गावातील नागरिक, तरुणाई तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. वातावरणात जागरूकता, प्रेरणा आणि ऐक्य निर्माण झाले. हा कार्यक्रम केवळ अंधश्रद्धा निर्मूलनासाठीच नव्हे, तर युवा शक्तीला सकारात्मक दिशादर्शन करणारा ठरला. समाजात विवेक, ऐक्य आणि कायदा–सुव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करत, विज्ञानाधिष्ठित विचारसरणीला चालना देणारा हा उपक्रम गावाच्या प्रगतीसाठी एक प्रेरणादायी पाऊल मानला जात आहे.

# कुमुदकांत पटेल यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्या कडे मांडल्या पुरग्रस्ताच्या व्यथा



नायगांव / प्रतिनिधी :– नांदेड जिल्ह्यातील नायगांव बिलोली मुखेड लोहा कंधार येथे दिनांक २८ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश पाऊस व पावसामुळे नदी नाल्याना मोठ्या प्रमाणात पुर आला आणि पुराच्या पाण्याचा एवढा ओघ होता कि नदीतील पाणी घराघरात पोहोचले व अनेकाची घरे पाण्याखाली गेली शेकडो एकर शेतीतीलल पिके जमीनदोस्त झाली या पुराचा फटका नायगाव तालुक्याला बसला व पुराची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री अतुल सावे . जिल्हा अधिकारी राहुल कर्डिले पोलीस प्रशासन महसूल प्रशासन यांनी आपल्या नायगांव येथिल पुरपरिस्तिथी पाहणी करण्यासाठी आले असता खैरगांव येथील माजी सरपंच तथा ग्रीन व्हॅली इंग्लिश स्कूलचे संचालक श्री कुमुदकांत पटेल यांनी पालकमंत्र्यांशी संवाद साधत नायगांव शहर व परिसरातील पुरग्रस्ताच्या व्यथा मांडल्या यावेळी पुरग्रस्त नागरिकांना व शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत द्यावी अशी मागणी त्यांनी केली यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते हनुमंत चंदनकर नांदेड

# साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती समारोपानिमित्त डॉ. सोमनाथ रोडे यांचे रविवारी व्याख्यान



लातूर :– साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती समारोपानिमित्त निमित्त 'जनसुरक्षा कायदा लोकशाहीसाठी घातक ' या विषयावर इतिहास तज्ञ तथा ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांचे रविवार ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता लातूर येथील हॉटेल अंजनी सभागृह, छत्रपती शिवाजी चौक, लातूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे असे आवाहन जी –२४ प्रणित अण्णाभाऊ साठे जयंती समिती आणि राष्ट्र सेवा दलाच्या वतीने जयंती समितीचे सचिव व राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी केले आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त १ऑगस्ट पासून महिनाभर रॅली, विविध विषयावर प्रबोधनात्मक नामांकित विचारवंतांची व्याख्याने असे विविध कार्यक्रम जिल्हाभर राबवण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचा समारोप सोहळा ३१ ऑगस्ट रोजी भव्य रित्या होणार आहे. त्यानिमित्ताने ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांचे व्याख्यान आयोजित केलेले आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे सचिव पांडुरंग देडे, नरसिंग घोडके, अ‍ॅड. सोमेश्वर वाघमारे कोषाध्यक्ष, अफजल कुरेशी कार्याध्यक्ष, शिरीष दिवेकर, बालाजी साबळे, बरकत काझी, डॉ. बी. आर. पाटील, उपाध्यक्ष, डॉ. गणेश गोमारे सहसचिव, मोहन कांबळे सेलुकर सहकोषाध्यक्ष, महानंदा शेवाळे महिला प्रतिनिधी, रामराजे आत्राम, यु.डी. गायकवाड निमंत्रक, शिवाजी शिंदे, प्रा. सुभाष भिंगे, प्रा. डॉ. अशोक नारनवरे, प्रा. डॉ. निशीकांत वारभूवन, प्रा. सुधीर आनवले, कॉ. विशंभरराव भोसले सल्लगार, गणपत तेलंगे, शिवाजी गायकवाड, राजकुमार नामवाड, विजय चव्हाण, प्रा. वैभव सरवदे, शिवाजी नरहरे, सुरेश काळे, ऍड. शेखर हवेली व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# दलित पँथरच्या वतीने 'सप्तरत्न' पुरस्कार सोहळा आज लातूरमध्ये




लातूर / प्रतिनिधी:– दलित समाजामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी आणि क्रांतिकारी विचारांची रुजवणूक करण्यासाठी कार्यरत असलेल्या भारतीय दलित पँथरच्या वतीने सप्तरत्न राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आज, रविवार दि. ३१ ऑगस्ट २०२५, रोजी सकाळी १० वाजता, नालंदा बुद्ध विहार, प्रकाश नगर, लातूर येथे संपन्न होणार आहे.या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणार्या मान्यवरांचा पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.पुरस्कारप्राप्त मान्यवर डॉ. श्रीकांत गायकवाड माजी प्राचार्य, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय शिक्षणरत्न,डी. एस. नरसिंगे धम्मरत्न,ऍड. लक्ष्मण शिंदे न्यायरत्न,डॉ. गणेश शिंदे नाट्यरत्न,ऍड. सुनील कांबळे सहकाररत्न,धम्माचारी कल्याण दासी पालकरत्न,कु. डॉ. वैभवी कांबळे प्रबोधनरत्नया पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष, कर्मयोद्धा मा. अंबादास शिंदे भूषविणार आहेत. कार्यक्रमास..... मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, गायन पार्टीच्या वतीने बुद्ध–भीम गीतांची सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.प्रसंगी मार्गदर्शक म्हणून प्रा.बापु गायकवाड,स्वागताध्यक्ष पँथर रणजित आचार्य,प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पँथर प्रा.शिवशरण हावळे,प्रमुख पाहुणे राज्यस्तरीय शिलरत्न पुरस्कारप्राप्त प्राचार्य डॉ.संजय गवईयावेळी कुटील राष्ट्रवाद ही लघु चित्रफीत दाखवण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक व कार्यकर्ते विशेष परिश्रम घेत आहेत. या गौरव सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# भटके विमुक्त,ओबीसींच्या आरक्षणाला धक्का नको; लातूरमध्ये बेमुदत धरणे आंदोलन सुरु




लातूर :– भटके विमुक्त,ओबीसी यांचे आरक्षण कायम राहवे,तसेच ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नका या मागणीसाठी आज शनिवार,दि.३० ऑगस्ट २०२५ पासून लातूरच्या गांधी चौकात बेमुदत धरणे आंदोलन सुरु करण्यात आले असून,त्यासंदर्भातले निवेदन मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,सामाजिक न्यायमंत्री,इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी जिल्हाधिकारी लातूरमार्ङ्गत देण्यात आले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, सध्या देश आणि राज्यात अनेकजण ओबीसी म्हणून आरक्षण द्या म्हणून शासन,प्रशासनाला वेठीला धरत आहे, यामुळे भारतीय संविधान आणि लोकशाहीचे अवमूल्यन होत आहे. खर्या अर्थाने आमचा ओबीसी, भटके विमुक्त बांधवांनी अद्याप सत्तेची ङ्गळे चाखलेली नाहीत, आता कुळे संविधानाच्या माध्यमातून कुठे ग्रामपंचायत सदस्य तर कुठे पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य आणि शासकीय सेवेत चपराशी साहेब म्हणूनल सहभागी होत असताना काही जात दांडग्यांच्या पोटात दुखत असून आम्हालाही ओबीसीमधून आरक्षण द्या म्हणून धुमाकूळ घालत आहेत,अशी टिका यात केली आहे.

आमचा कोणाच्या आरक्षणाला विरोध नाही, ओबीसीमधून आरक्षण मागणार्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे, याबाबत आमची काही हरकत नाही, मात्र ओबीसीमधून अजिबात नाही,कदापिही आरक्षण देण्यात येऊ नये, अन्यथा आम्हाला सर्व ओबीसी,भटके विमुक्त आणि आदिवासींना रस्त्यावर उतरून संघर्षात्मक आंदोलन उभे करावे लागेल,अशा इशाराही या निवेदनात देण्यात आला असून हे आंदोलन सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळात चालणार असल्याचे विमुक्त भटके आदिवासी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष हरिभाऊ गायकवाड, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भारत काळे, भारतीय राष्ट्रीय आदिवासी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष रामराजे आत्राम, बाळासाहेब ङ्गासे,गंगाधर जाधव गुरुजी, अजित निंबाळकर, दगडूसाहेब पडीले, महाराष्ट्र राज्य परिट धोबी संघटना व महाराष्ट्र राज्य धोबी सेवा मंडळाचे गणपतराव तेलंगे, रंगनाथ घोडके,नाभिक समाज संघटनेचे भाऊसाहेब शेंद्रे, सखाराम कानडे, पिराजी झाकणे, ऍड.मंगलदास जवादे,ऍड.सुनील ङ्गड, ऍड.सुधाकर आरसुडे, विश्वकर्मा संघटनेचे कृष्णा पांचाळ, अनिल जाधव आदिंनी दिला आहे.

# 'टॅरिफ लादणं बेकायदेशीर' ; अमेरिकेच्या कोर्टाचा डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा झटका

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना टॅरिफ प्रकरणी अमेरिकन न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. यूएस कोर्ट ऑफ अपील्स द फेडरल सर्किट यांचं म्हणणं आहे की, ट्रम्प यांनी लादलेले बहुतांश टॅरिफ हे बेकायदेशीर आहेत. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आणीबाणीच्या परिस्थितीतले अधिकार प्राप्त आहेत पण त्यामध्ये टॅरिफ लादण्याचा अधिकार नाही. या निर्णयानंतर अमेरिकेच्या आर्थिक धोरणांना फटका बसला आहे. अमेरिकन लोकशाहीत न्यायव्यवस्थेची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. मात्र, कोर्टाने १४ ऑक्टोबरपर्यंत टॅरिफ कायम ठेवण्याची परवानगी दिली असल्याने ट्रम्प प्रशासनाला सुप्रीम कोर्टात अपील करण्याची संधी मिळाली आहे.ट्रम्प यांनी निर्णयाला फेटाळले दुसरीकडे, ट्रम्प यांनी कोर्टाचा निर्णय फेटाळत चुकीचे आणि पक्षपाती म्हटले आहे. त्यांनी सोशलवर पोस्ट करत म्हटले की, सर्व टॅरिफ अजूनही लागू आहेत. ही पक्षपाती अपील कोर्टाने चुकीने घेतलेला निर्णय आहे. शेवटी अमेरिकेचाच विजय होईल. जर हे टॅरिफ काढले गेले तर देशासाठी मोठी आपत्ती होईल. अमेरिका आता असा व्यापारात तोटा सहन करणार नाही. हे टॅरिफ अमेरिकन मजूरांसाठी आणि 'मेड इन अमेरिका' उत्पादनांसाठी आवश्यक आहे. सर्वांनी लक्षात ठेवावे की, टॅरिफ हे आमचे मजूर आणि कंपन्या मजबूत करणारे साधन आहे.

# मनपामार्फत शहरातील विविध गणेश मंडळ येथे आरोग्य शिबिराचे आयोजन.





लातूर/ प्रतिनिधी: ३० ऑगस्ट रोजी लातूर शहरातील विविध गणेश मंडळ येथे १५ आरोग्य केंद्र मार्फत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरा मध्ये १५३४ नागरिकांची तपासणी व रक्त तपासणी करण्यात आली. सर्वाधिक रुग्णतापासणी प्रा ना केंद्र राजीव नगर व प्रा ना केंद्र मंठाळे नगर अंतर्गत,१८२ व १२७ रुग्णाची तपासणी करण्यात आली व आयुषमान आरोग्य मंदिर शिवाजी हौसिंग सोसायटी अंतर्गत १०६ रुग्णाची तपासणी करण्यात आली. या तीन आरोग्य केंद्र १०० पेक्षा जास्त रुग्णाची तपासणी करण्यात आली आहे. आरोग्य विभाग,लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्यावतीने शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने आयुक्त श्रीमती मानसी यांच्या निर्देशानुसार व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून प्रत्येक दवाखाना अंतर्गत दर महिन्याच्या २९ व ३० तारखेला सार्वजनिक ठिकाणी/वॉर्ड व गणेश मंडळ मध्ये आरोग्य शिबिर घेण्यात आले आहेत. मनपा आरोग्य विभागा अंतर्गत कार्यन्वित असलेले एकूण ३२ आरोग्य केंद्र येथे दैनंदिन आरोग्य सेवा सुविधा नागरिकांना मनपा देत असते.. परंतु शासकीय योजना व आरोग्य सुविधा अधिकाधिक नागरिकापर्यंत पोचवण्याचा दृष्टीने संबंधित दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात दरमहा शिबिर घेऊन किमान १०० रुग्णांची तपासणी करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी विभागास दिले आहेत.

आरोग्य शिबिरामध्ये एकूण.१५३४ रुग्णाची वैद्यकीय तपासणी करून मोफत औषध उपचार करण्यात आले. या सर्व रुग्णांना या शिबिराचा लाभ झाला असून रक्तदाब, मधुमेह रुग्णचे निदान व यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे . या शिबिरा अनंतर्गत आयुष्मान कार्ड एकूण ४९५ कार्ड नागरिकांचे काढण्यात आले आहेत या शिबिरास, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांनी भेटी देऊन आढावा घेतला.सदरील आरोग्य शिबिर एप्रिल महिन्यापासून दरमहा २९ व ३० तारखेला नियमित पणे शहराच्या वेगवेगळ्या भागात होणार आहेत तसेच लातूर शहरातील विविध गणेश मंडळ येथे देखील आरोग्य शिबीर आयोजित होत असल्याने मनपाच्या आरोग्य सेवा अधिकाधिक नागरीकापर्यंत पोचवता येतील व या आरोग्य शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मनपा मार्फत करण्यात आले आहे. तसेच या शिबिराच्या आयोजनाकरीता माता व बाल संगोपन कार्यक्रम अधिकारी डॉ शामा जाधव व शहर कार्यक्रम व्यवास्थापक डॉ रामेश्वर कलवले,सार्वजनिक आरोग्य व्यवास्थापक अंकुश समाधान व सर्व प्रा ना केंद्र येथील सर्व वैद्यकीय अधिकारी व आयुष्मान आरोग्य मंदिर येथील सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी परिश्रम घेतले व यशस्वी रित्या आरोग्य शिबीरा आयोजन करण्यात आले.

# ३ सप्टेंबर रोजी ज्वेल ऑफ नवी मुंबई–लॉर्ड बुद्धा पार्क येथे भंते विनाचार्य–भंते ज्ञानज्योती याचे आगमन

### बुद्धगया, महाबोधी बुद्ध विहार मुक्ती आंदोलन परिसंवाद यात्रेत सहभाग घेतलेल्या सर्व भिकू संघाचे विविध ठिकाणी जंगी स्वागत

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडियाआदर्श शाखा जुईनगरच्या वतीने सर्व पदाधिकारी, बौध्दाचार्य, आजी–माजी श्रामणेर, केंद्रीय शिक्षक, शिक्षीका आणि जुईनगर, नेरूळ, सानपाडा, सीवुड येथील उपासक/उपासिका यांना सूचित करण्यात येते की. महाबोधी महा बुद्ध विहार ब्राह्मण मुक्त करण्यासाठी जे आंदोलन सुरू आहे त्याचे समर्थनार्थ नागपूर दिक्षाभुमी ते मुंबई चैत्यभूमी पर्यंत आद. भंते विनयाचार्य आणि आद. भंते ज्ञानजोती आणि त्यांचा भिक्षुसंघ नवी मुंबई येथे येत आहे. या भिकू संघास महेश खरे ( नवी मुंबई जिल्हाध्यक्ष आर. पी.आय.) यांचे वतीने भोजन दान ठेवले आहे, त्या करिता बुधवार दिनांक : ३/९/२५ रोजी. सकाळी १०:३० वाजता. स्थळ :– मूलगंध कुटी बुद्ध विहार चिंचोली तलाव सेक्टर २५, जुईनगर नवी मुंबई येथे धम्म सेवा देण्यासाठी आपण सर्वांनी सफेद वस्त्र परिधान करून वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती. संघाचे भोजन झाल्यानंतर सकाळी ११: ०० वाजता भिक्षुसंघ आणि भंते सोबत असलेले आंदोलनकारी आणि आपण त्यांचे सह कपिलवस्तू बुद्ध विहार सेक्टर–१० ते नेरूळ स्टेशन मार्गे ज्वेल ऑफ नवी मुंबई – लॉर्ड बुद्धा पार्क, या पवित्र स्थळी भेट देणार आहोत. तिथे बुध्द वंदना घेऊन, भिक्षु संघाला दान देऊन, त्यांचा आपण सर्वांनी आशिर्वाद घेतल्यानंतर त्यांची पुढिल भेट लुंबिनी बुद्ध विहार सेक्टर – ४८ सीवूड येथून पुढील आंदोलनासाठी अनुमोदित करणार आहोत. तरी नवी मुंबईतील सर्व बौध्द बांधवांना कळकळीची विनंती करण्यात येते की, बुद्धगया येथील महाबोधी बुद्ध विहार ब्राह्मण मुक्त आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व बौध्द परिवारानी बहुसंख्येने उपस्थित रहावून आंदोलनाला सहकार्य करावे. आपले विनित नवी मुंबई जिल्हा सर्व बौध् संघटना व बौध्द परिवार जयभीम नमो बुध्दाय जय भारत जय संविधान निमंत्रक : दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया नवी मुंबई.





PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE